खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

॥ आजचा सुविचार ॥
एखादा देश आणि त्याची नैतिक मुल्ये किती महान आहेत, हे तिथल्या प्राण्यांना कशी वागणूक देतात त्यावरूनही कळून येते.
– महात्मा गांधी

वर्ष : ०६ | अंक : २५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०८ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## ६५ गोवंशाची तस्करी रोखली; २७.८२ लाखांचा मुद्देमाल जप्त!



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोवंशाच्या अवैध आणि क्रूर वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत ६५ जनावरे जप्त केली. ही कारवाई रविवारी (६ सप्टेंबर) घुग्घुस पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिपरी फाटा, धानोरा – गडचांदूर मार्गावर करण्यात आली. या कारवाईत दोन जनावरांचा मृत्यू झाला असून, ६३ जनावरांना सुखरुप वाचविले. या प्रकरणी ट्रक चालक ओमप्रकाश मुर्लीधर कावळे (३८, यशोधरानगर, नागपूर), मजूर कलीम सईद मलिक (३३) आणि शाहरुख मोहम्मद अयुब मलीक (३०), दोघेही रा.कैलासपूर, उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर इरफान शेख (गडचांदूर), तौसिफ भाई निजाम अहमद (नागपूर) आणि अरबाज कुरेशी (नागपूर) हे आरोपी फरार आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोवंशाची अशोक लेलँड ट्रकमधून अत्यंत दाटीवाटीने वाहतूक केली जात होती. जनावरांसाठी चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नव्हती. त्यामुळे वाहतुकीदरम्यान दोन जनावरांचा जागीच मृत्यू झाला. उर्वरित ६३ जनावरांना पोलिसांनी ताब्यात घेत पुढील उपचार, चारा–पाणी आणि संरक्षणासाठी प्यार फाउंडेशन, पडोली येथे दाखल केले. या कारवाईत पोलिसांनी १४ चाकी ट्रक, गोवंश आणि मोबाईल फोनसह एकूण २७ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

## ‘डीजे’ विरोधात ध्वनिवर्धन! पुण्यातील मोर्चात बंदीची मागणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, पुणे :** ‘डीजेबंदी’विरोधात ध्वनिवर्धनाचे चित्र रविवारी राज्यातील विविध भागांत दिसले. ‘डीजे’च्या दणदणाटामुळे त्रासलेले शेकडो पुणेकर रविवारी रस्त्यावर उतरले. ‘सोलापूर, मुंबई आणि नागपूरमध्ये ‘डीजे’बंदी होऊ शकते, तर पुण्यात का नाही,’ असा संतप्त प्रश्न त्यांनी केला. दुसरीकडे, विरोधकांसह सत्ताधारी नेत्यांनीही ‘डीजे’बंदीच्या सुरात सूर मिसळला.

सार्वजनिक उत्सवातील गोंगाटाविरोधात पुण्यात विद्यानंद बापट यांनी आवाज उठविल्यानंतर ‘डीजे’विरोधात आता लोकचळवळ उभी राहिल्याचे चित्र रविवारी दिसून आले. ‘डीजे, ध्वनिवर्धक बंदीशिवाय आता माघार नाही’ असा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.



**‘लाउड स्पीकरविरोधी पुणेकर मंच’**

स्पीकरच्या भिंतीवर बंदी घाला, तसेच ढोल–ताशा पथकांचे वादन सर्वोच्च न्यायालयाने आवाजाबाबत आखून दिलेल्या नियमांमध्ये व्हावे, अशी मागणी करणारेविद्यानंद बापट यांना महापालिकेच्या नागरी सभेतून बाहेर काढण्यात आले होते. गेल्या आठवड्यात एका वृत्तवाहिनीशी बोलताना बापट यांना मारहाण करण्यात आली. या घटनेचा निषेध आणि स्पीकरच्या भिंतींवर बंदी घालण्याच्या मागणीसाठी ‘लाउड स्पीकरविरोधी पुणेकर मंच’ने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत पुणेकर मोर्चामध्ये सहभागी झाले. जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी लक्ष्मीबाई चौक ते महानगरपालिका या दरम्यान निघालेल्या मोर्चात नागरिकांचा रोष पाहायला मिळाला.

सर्व धर्मीय आणि राजकीय उत्सवांमध्ये कर्कश ध्वनिवर्धकावर बंदी घाला, अशी मागणी यावेळी करण्यात आली. ‘डीजेबंदी झालीच पाहिजे’, ‘शांतता आमचा हक्क आहे’, ‘आवाज बंद कर डीजे, तुला पुणेकरांची शपथ हाय’ अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

**सुरक्षेच्या काराणास्तव बापट अनुपस्थित...**

पुण्यात दणदणाटाविरोधात आवाज उठवणारे विद्यानंब बापट यांच्यावर गेल्या आठवड्यात हल्ला झाला होता. एका वृत्तावाहिनीशी बोलताना बापट यांना एका तरुणाने मारहाण केली होती. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव बापट या मोर्चामध्ये सहभागी होऊ शकले नाहीत. मात्र, त्यांच्या ’डीजे’ बंदीच्या मागणीला बळ मिळाल्याचे चित्र रविवारी पुण्यात दिसले.

**‘सण–उत्सवासाठी नियमावली हवी’**

‘सण–उत्सवांमध्ये डॉल्बी आणि डीजे का लावता? सण पारंपारिक पद्धतीने का साजरे होत नाहीत?’ असे प्रश्न करीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सण–उत्सवासाठी नियमावलीची आवश्यकता अधोरेखित केली. ’गोविंदांच्या मंचावर नाच केले जातात, ही उत्तरेकडील संस्कृती आहे. महाराष्ट्राने इतरांचे अनुकरण का करावे?’ असा प्रश्नही त्यांनी केला.

## पाऊस नाही, हातात पैसा नाही; शेतकरी आर्थिक कोंडीत...



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.०७, सोयगाव (छ. संभाजीनगर) :** पावसाने दडी मारल्याने खरीप पिके संकटात सापडली असून, दुसरीकडे शेतीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. पिकांसाठी खते व फवारणीची औषधे घेण्यासाठी पैसे उभे करणे कठीण झाले असताना आता तोंडावर आलेल्या पोळा सणाच्या खर्चाचीही चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. शेतात पैसा ओतूनही पिकाला पाण्याची प्रतीक्षा आणि हातात उत्पन्न नसल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

अंजोळा शिवारातील ई–पिक पाहणीच्या अनुषंगाने माजी सरपंच संजय भिकन भोसले यांनी महसूल प्रशासनाकडे दिलेल्या अर्जामुळे या आर्थिक कोंडीत आणखी एका मुद्द्याची भर पडली आहे. ई–पिक पाहणीसाठी नियुक्त सहाय्यकाकडून प्रति प्लॉट १०० रुपये घेतले जात असल्याचा आरोप त्यांनी अर्जातून केला आहे. संबंधित सहाय्यकाची बदली करावी तसेच शेतकऱ्यांकडून घेतलेली रक्कम परत करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

मात्र, पैसे घेतल्याचा आरोप हा अर्जदाराने केलेला दावा असून त्याची स्वतंत्र प्रशासकीय चौकशी होणे बाकी आहे. त्यामुळे आरोपांची सत्यता चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे. महसूल प्रशासनाने या तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन वस्तुस्थिती तपासावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

**पिके जगवायची की घरचा खर्च भागवायचा?**

पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसमोर पिके वाचविण्यासाठी खते, कीटकनाशके, फवारणी आणि इतर शेतीकामांचा खर्च उभा आहे. उत्पन्नाची शाश्वती नसताना हा खर्च भागविण्यासाठी कर्ज किंवा उधारीचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे पिकाला पाणी नाही आणि खर्चासाठी पैसा नाही, अशी अवस्था अनेक शेतकऱ्यांची झाली आहे.

त्यातच पोळा सण जवळ आल्याने बैलांना सजविण्यासाठी लागणारा साज, सजावट आणि सणाचा खर्च कसा करायचा, याचीही चिंता आहे. वर्षभर शेतकऱ्याच्या कष्टात साथ देणाऱ्या बैलांचा सण उत्साहात साजरा करण्याची परंपरा असली, तरी यंदा आर्थिक अडचणीमुळे त्या उत्साहावरही मर्यादा येण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांकडे पिकांसाठी खते–औषधे घेण्याइतके पैसे नाहीत. पाऊस पडत नसल्याने पिकांचे काय होणार, याची चिंता आहे. अशा परिस्थितीत अतिरिक्त आर्थिक भार पडणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे, अशी भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.

शेतकऱ्यांची ही आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने ई–पिक पाहणीच्या तक्रारीची तातडीने चौकशी करावी आणि दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी. त्याचबरोबर पावसाअभावी अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.

## एल.के. विवांताच्या बेकायदेशीर बांधकामावर पनवेल महानगरपालिकेचा हातोडा

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०७, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिका हद्दीतील बेकायदेशीर बांधकामांविरोधातील कारवाईला वेग आला असून कामोठे येथील एल.के. विवांता (L.K. Vivanta) या प्रकल्पातील अनधिकृत बांधकामावर पालिकेने मोठी तोडक कारवाई केली आहे. संबंधित प्रकल्पाला १२ मजल्यांची परवानगी असताना विकासकाने तब्बल १६ मजली इमारत उभारली होती. यातील वरचे चार मजले अनधिकृत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पनवेल महानगरपालिकेने हातोडा चालवत ते मजले पाडण्याची कारवाई केली.

या कारवाईपूर्वी विकासकाने उच्च न्यायालयात धाव घेत पालिकेच्या कारवाईला स्थगिती मिळविण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने विकासकाचा अर्ज फेटाळून लावल्याने पालिकेला कारवाईचा मार्ग मोकळा झाला.

विशेष म्हणजे, अनधिकृतपणे बांधण्यात आलेले हे चार मजले विकासकाने अनेक ग्राहकांना विकले होते. त्यामुळे आता या घरांमध्ये गुंतवणूक केलेल्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांनी गुंतवलेली रक्कम परत मिळणार का, असा प्रश्न संबंधित ग्राहकांकडून उपस्थित केला जात आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांविरोधातील अशा प्रकारच्या तोडक कारवाया यापुढेही सुरू राहणार आहेत. ही कारवाई बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या विकासकांसाठी इशारा मानली जात आहे.

**ग्रामपंचायत हद्दीतील अनधिकृत बांधकामांवर प्रश्नचिन्ह**

दरम्यान, महानगरपालिका हद्दीत कारवाई होत असताना ग्रामपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर सिडकोकडून अशी कठोर कारवाई का केली जात नाही, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ग्रामपंचायत हद्दीतील सुमारे ७० ते ८० टक्के बांधकामे अनधिकृत असल्याचा आरोप विविध स्तरांतून करण्यात येत असून त्यावर संबंधित यंत्रणा काय भूमिका घेणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



**ग्राहकांनी रेरा नोंदणीकृत घरांचीच खरेदी करावी – महापौर नितीन पाटील**

या कारवाईबाबत प्रतिक्रिया देताना पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील म्हणाले, ग्राहकांनी रेरा नोंदणीकृत आणि अधिकृत घरांचीच खरेदी करावी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बेकायदेशीर बांधकामांना आळा घालण्यासाठी रेरा कायदा अस्तित्वात आणला आहे. त्यामुळे नागरिकांचीही जबाबदारी आहे की त्यांनी घर खरेदी करण्यापूर्वी संबंधित प्रकल्प अधिकृत आहे की नाही याची खात्री करावी.

ते पुढे म्हणाले, काही विकासक स्वतःच्या फायद्यासाठी ग्राहकांना आमिष दाखवून व खोटी आश्वासने देऊन घरे विकतात. अशा विकासकांना यापुढे अजिबात पाठीशी घातले जाणार नाही. बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या विकासकांविरोधात एमआरटीपी आणि रेरा कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल.

पनवेल महानगरपालिकेच्या या कारवाईमुळे बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या विकासकांमध्ये खळबळ उडाली असून, भविष्यात अशा प्रकारच्या बांधकामांवर अधिक कठोर पावले उचलली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## पारनेरकर रहिवासी संघाची ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची दहीहंडी दिमाखात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, अहिल्यानगर :** गोविंदा रे गोपाळा... च्या जयघोषात पारनेरकर रहिवासी संघ, मुंबईच्या वतीने आयोजित ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची भव्य दहीहंडी कामोठ्यात दिमाखात पार पडली. सेक्टर–३६ मधील संत तुकाराम महाराज मंदिराच्या प्रांगणात झालेल्या या ८ व्या उत्सवाला कामोठे, मुंबई, नवी मुंबई, पनवेलमधील हजारो पारनेरकरांनी गर्दी केली होती.

पारनेर, जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील हजारो कुटुंबे नोकरी–व्यवसायासाठी मुंबईत स्थायिक झाली आहेत. शहर बदलले तरी मातीशी नाळ कायम ठेवण्याचे काम संघ करतोय. त्यामुळेच हा उत्सव धार्मिकतेपेक्षा एकजुटीचा सोहळा ठरला.

यंदा महिला गोविंदा पथकाची मानाची दहीहंडी आणि ‘होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा’ हे मुख्य आकर्षण होते. सकाळी दहीहंडी पूजन, शिवाजी महाराज आरती, त्यानंतर गोविंदा पथकांची सलामी, भजन, ऑर्केस्ट्राने दिवसभर उत्सवमय वातावरण होते.

स्पर्धेत शिवप्रेरणा पथक प्रथम, राजे शिवाजी स्पोर्ट्स क्लब द्वितीय तर आई–बाबा पथक, कामोठे तृतीय ठरले. विजेत्यांना रोख बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात आले.

> गेल्यावर्षी आमदार दाते सरांनी राजकीय झेंडे बाजूला ठेवून एकत्र येण्याचा सल्ला दिला होता, तो आम्ही स्वीकारला. कामोठे ’मिनी पारनेर’ आहे, इथे मजबूत संघटना व्हावी यासाठी आम्ही सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन केले. मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याची खंत आहे. भविष्यातही पारनेरकरांच्या हितासाठी सर्वांनी एकत्र यावे.
>
> **– संजय आहेर**
> **(सचिव पारनेरकर रहिवासी संघ दहीहंडी उत्सव समिती)**

कार्यक्रमास आमदार काशिनाथ दाते, आमदार प्रशांत ठाकूर, सभापती रविंद्र जोशी, विकासदादा घरत, संदीप पाटील, राहुल पाटील शिंदे, प्रशांत गायकवाड, वसंत छडे, विजुभाऊ औटी, सचिन पाटील वराळ, दत्ता कुलट, भाऊ भगत, मेघना गाडगे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पूजन धनराज विसपुते, शामसुंदर कुलथे, ज्योती देशमुख व कामोठे पोलीस निरीक्षक मोहन पवार यांच्या हस्ते झाले.



आमदार दाते म्हणाले, पारनेरकरांनी मातीशी नाते तोडले नाही. दहीहंडी हा संघभावना व एकजुटीचा संदेश देणारा उत्सव आहे. उत्सवाच्या यशस्वितेसाठी अध्यक्ष भाऊशेठ पावडे, कार्याध्यक्ष कुंडलिक वाफारे, सचिव कृष्णा ढोमे, उपाध्यक्ष दिलीप घुले, सहसचिव संजय आहेर, मनोज कवडे, महादेव पुंडे, धनंजय निमसे, शुभम वाफारे, जालिंदर खोसे, सबाजी जराड, गणेश गुंड आदींनी परिश्रम घेतले.




## आशियाई पाण्याचा प्रश्न

नेपाळमधील महाप्रलयाने पुन्हा एकदा हिमालय आणि तिबेटच्या पठाराकडे जगाचे लक्ष वेधले आहे. तिबेटच्या सीमेजवळील हिमनदी आणि बर्फ-खडकांच्या प्रचंड हालचालीमुळे निर्माण झालेल्या पाण्याच्या लोंढ्याने भोटेकोशी आणि त्रिशूली नदीखोऱ्यात हाहाकार माजवला. प्राथमिक वैज्ञानिक आकलनानुसार ही घटना हिमनदी कोसळणे, नदीला तात्पुरता अडथळा निर्माण होणे आणि त्यानंतर तो अडथळा फुटून प्रचंड पाणी व गाळ खाली येणे अशा साखळीमुळे घडली. ही घटना चीनने जाणीवपूर्वक घडवून आणली, असा निष्कर्ष काढण्याचे कोणतेही कारण नाही. परंतु त्याने एक मूलभूत प्रश्न पुन्हा समोर आणला आहे – आशियाच्या पाण्याचे भवितव्य नेमके कुठे ठरते? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला तिबेटच्या पठारावर मिळते.

तिबेट हा आशियाच्या जलव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. म्हणूनच हिंदुकुश, हिमालय आणि तिबेटच्या पठाराला 'तिसरा ध्रुव' आणि तिबेटच्या पठाराला 'आशियाचे जलस्तंभ' म्हटले जाते. आर्क्टिक आणि अंटार्क्टिकनंतर पृथ्वीवरील सर्वांत महत्त्वाच्या बर्फसाठ्यांपैकी एक असलेला हा प्रदेश आशियातील असंख्य नद्यांना पाणी पुरवतो. हवामान बदलामुळे या प्रदेशातील हिमनद्या, हिमसाठे आणि जलव्यवस्था वेगाने बदलत आहेत. अलीकडील संशोधनानुसार आशियाच्या या 'वॉटर टॉवर'वर हवामान बदलाबरोबरच जलविद्युत प्रकल्पांचा वाढता विस्तारही परिणाम करत आहे. या प्रदेशातून उगम पावणाऱ्या नदीप्रणालींवर अवलंबून असलेल्या कोट्यवधी लोकांच्या जलसुरक्षेसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. तिबेटचे पठार सुमारे चार हजार मीटरपेक्षा अधिक उंचीवर पसरलेला विस्तीर्ण भूभाग आहे. सिंधू, सतलज, ब्रह्मपुत्रा, कर्णाली, कोसी, गंडक, मेकाँग, सालवीन अशा अनेक महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय नद्यांच्या जलप्रणालीशी त्याचा थेट संबंध आहे. यांगत्से आणि पीत नदीसारख्या चीनच्या प्रमुख नद्यांचाही उगम या उच्च पर्वतीय जलव्यवस्थेशी संबंधित आहे. म्हणजेच तिबेटचा प्रश्न केवळ चीनचा अंतर्गत प्रश्न राहिलेला नाही. तिबेटच्या जलव्यवस्थेचा परिणाम भारत, नेपाळ, भूतान, बांगलादेश, पाकिस्तान, म्यानमार, थायलंड, लाओस, कंबोडिया आणि व्हिएतनामपर्यंत पोहोचतो. यातील भारतासाठी सर्वांत महत्त्वाची नदी म्हणजे ब्रह्मपुत्रा. तिबेटमध्ये यारलुंग त्सांगपो या नावाने वाहणारी ही नदी अरुणाचल प्रदेशात प्रवेश करते आणि पुढे आसाममधून वाहत बांगलादेशात जाते. त्यामुळे तिच्या उगमक्षेत्रातील कोणताही मोठा भौगोलिक, पर्यावरणीय किंवा मानवी हस्तक्षेप महत्त्वाचा ठरतो. याच ठिकाणी जलसुरक्षा आणि सामरिक सुरक्षा एकमेकांशी जोडल्या जातात. चीनने तिबेटमध्ये मोठ्या प्रमाणावर जलविद्युत प्रकल्प उभारले आहेत आणि आणखी प्रकल्पांची योजना आहे. वरच्या प्रवाहावर असलेल्या देशाकडे नदीच्या प्रवाहाचे नियमन करण्याची क्षमता असते. त्यामुळे खालच्या देशांसाठी प्रश्न केवळ पाण्याच्या एकूण उपलब्धतेचा नसतो; तर पाणी कधी, किती आणि कोणत्या पद्धतीने उपलब्ध होते, हा देखील तितकाच महत्त्वाचा असतो. याचा अर्थ असा नाही की चीन जाणीवपूर्वक भारतात पूर किंवा दुष्काळ निर्माण करेलच. परंतु एका देशाकडे नदीच्या उगमक्षेत्रावर आणि दुसऱ्या देशाकडे तिच्या खालच्या प्रवाहावर अवलंबित्व अशी विषम भौगोलिक परिस्थिती निर्माण झाली की त्यातून सामरिक जोखीम निर्माण होते. उदाहरणार्थ, पावसाळ्यात धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाणी सोडले गेले किंवा जलाशयांचे व्यवस्थापन पुरेशा समन्वयाशिवाय झाले तर अरुणाचल प्रदेश आणि आसामसारख्या भागांमध्ये पूरस्थिती गंभीर होऊ शकते. उलट, कोरड्या हंगामात पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात रोखला किंवा वळवला गेला तर त्याचे परिणाम पाणी उपलब्धतेवर होऊ शकतात. भारतासाठी हा प्रश्न विशेषतः संवेदनशील आहे. अरुणाचल प्रदेश आणि आसाममधील ब्रह्मपुत्रेची परिसंस्था, शेती, मानवी वस्ती आणि अर्थव्यवस्था नदीच्या नैसर्गिक प्रवाहाशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे भारताने ब्रह्मपुत्रेसह सर्व सीमापार नद्यांबाबत उपग्रह निरीक्षण, जलमाहितीचे संकलन, पूरपूर्व इशारा प्रणाली आणि आंतरराष्ट्रीय जलमाहितीची देवाणघेवाण अधिक सक्षम करण्याची गरज आहे. ,या प्रश्नाकडे केवळ चीनच्या दृष्टिकोनातून पाहणेही योग्य ठरणार नाही. तिबेट आणि हिमालय स्वतःच हवामान बदलाच्या प्रचंड दबावाखाली आहेत. वाढते तापमान, हिमनद्यांचे आकुंचन, हिमसाठ्यातील बदल, वितळणारे पर्माफ्रॉस्ट, अस्थिर पर्वतीय उतार आणि हिमनदीजन्य सरोवरांचा वाढता धोका यामुळे अचानक पूर, भूस्खलन आणि हिमस्खलनाच्या घटना अधिक गंभीर होऊ शकतात. नेपाळमधील दुर्घटना याचे ताजे उदाहरण आहे. अशा घटना एक महत्त्वाचा धडा देतात. हिमालयातील नदी ही केवळ पाण्याचा प्रवाह नाही; ती एका अतिशय संवेदनशील आणि बदलत्या परिसंस्थेचा भाग आहे. त्यामुळे तिबेटच्या पठाराकडे केवळ चीनच्या सार्वभौमत्वाच्या किंवा सीमावादाच्या चष्म्यातून पाहणे पुरेसे नाही. या नद्यांनी हजारो वर्षे मानवी संस्कृती निर्माण केल्या. सिंधू खोऱ्यातील प्राचीन संस्कृती असो किंवा चीनमधील पीत नदीच्या खोऱ्यात विकसित झालेल्या संस्कृती – मानवी सभ्यतेचा विकास नदीकाठाशीच झाला. आज मात्र याच नद्यांवर धरणे, जलविद्युत प्रकल्प, प्रदूषण, नदीपात्रातील अतिक्रमणे, भूजलाचा अतिरेक आणि हवामान बदलाचा संयुक्त दबाव आहे. आशियाची लोकसंख्या जगातील सर्वाधिक आहे. शेती, अन्नसुरक्षा, उद्योग, ऊर्जा, मानवी आरोग्य आणि उपजीविका या सर्वांचा आधार पाण्यावर आहे. त्यामुळे आशियात पाण्यावरील संघर्ष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

– डॉ. सुमंत पांडे

# १५ वर्षांचा प्रतीक्षेचा रस्ता... आणि संपणारे जीव!



**१५ वर्षे !**

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला तब्बल १५ वर्षे झाली. एका पिढीचा जन्म झाला, ती शाळेत गेली, मोठी झाली... पण हा रस्ता मात्र अजूनही अपूर्णच आहे! हा महामार्ग नाही, तर आमच्या कोकणकरांच्या सहनशीलतेची परीक्षा पाहणारा सापळा आहे.

**अपघातांची मालिका कधी थांबणार?**

काम चालू असतानाच चिपळूण शहरात भरदिवसा पूल कोसळतो, परशुराम घाटात रस्ता खचतो, पावसाचे पाणी थेट रस्त्यावर येते. आणि उर्वरित काम चालू असल्याने पनवेल ते इंदापूर हा अवघा ८४ किमीचा प्रवास आजही सर्वाधिक वेळ खातो आणि जीवही घेतो.

सरकार सांगतं – शेवटच्या टप्प्यातील काम बाकी आहे.

अहो, हेच शेवटच्या टप्प्यातील बाकी असलेलं काम आज रोज निष्पापांचे बळी घेत आहे. अर्धवट पूल, चुकीचे डायव्हर्शन आणि अंधारात न दिसणारे बॅरिकेड्स हेच अपघातांना निमंत्रण देत आहेत.

**कोकणकर व्यथित आहे...**

गणेशोत्सव चार दिवसांवर आला आहे. लाखो चाकरमानी गावी जायला निघाले आहेत, पण प्रत्येकाच्या मनात आनंदापेक्षा भीतीच जास्त आहे.

गाडीत बसताना प्रत्येक गणेशभक्त बाप्पाला हात जोडून एकच प्रार्थना करतोय – बाप्पा पाव, प्रवास सुखाचा होऊ दे!

ज्या रस्त्यावरून सुखरूप जाण्यासाठी देवाला साकडं घालावं लागतं, तो रस्ता खरंच विकासाचा म्हणायचा का?

प्रतिवर्षी तीच कोंडी... पाली, माणगाव, चिपळूण, संगमेश्वर, लांजा... १२ तासांचा प्रवास २० तासांत! गाडीत लहान मुलं रडतात, वृद्ध माणसं तळमळतात आणि आमचा कोकणकर मात्र सगळं निमूटपणे सहन करतो.

**व्यवस्थेला भेदणारे प्रश्न...**

सत्ताधारी, सरकार आणि कोकणातील सर्वपक्षीय आमदार-खासदारांना एकच सवाल –

समृद्धी महामार्ग ७०१ किमीचा ३ वर्षांत पूर्ण होतो, अटल सेतू समुद्रात ५ वर्षांत पूर्ण होतो, मेट्रो आणि बुलेट ट्रेन वेगात धावते...!

मग फक्त ४७१ किमीचा मुंबई-गोवा महामार्ग १५ वर्षांत का पूर्ण होत नाही?

बाकीचे मार्ग पूर्ण होतात, मग कोकणकरांवरच अन्याय का?

कारण कोकणकर कधी जाब विचारत नाही म्हणून? की कोकणकर सहन करतो म्हणून?

**आता तरी जागे व्हा!**

या गणेशोत्सवात एकही अपघात होऊ नये, यासाठी फक्त बैठका नकोत, तर प्रत्यक्ष रस्त्यावर उतरा. अपूर्ण काम पूर्ण करा, धोक्याच्या ठिकाणी लाईट लावा, पोलीस तैनात करा.

आणि माझ्या कोकण बांधवांनो – गाडी सावकाश चालवा. घरी तुमची आई आणि तुमचा लाडका बाप्पा तुमची आतुरतेने वाट पाहतोय.

**बाप्पा, या मृत्यूच्या सापळ्यातून आम्हाला सुखरूप घरी पोहोचव!**

**गणपती बाप्पा मोरया!**

**– उदय गणपत दणदणे**
**पत्रकार/सामाजिक कार्यकर्ता**
**निवोशी-गुहागर**

# खरा गुन्हेगार कोणकायदा मोडणारा की सत्तेला प्रश्न विचारणारा?

सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झालेला हा प्रश्न केवळ दोन व्यक्तींच्या प्रकरणापुरता मर्यादित नाही; तो आपल्या लोकशाही व्यवस्थेतील कायद्याच्या समान अंमलबजावणीशी संबंधित आहे.

दिल्लीतील जंतर-मंतर येथील आंदोलनादरम्यान झालेल्या कथित मारहाणीनंतर स्वतंत्र भारद्वाज यांचे नाव चर्चेत आले. त्यांच्या एका व्हिडिओ/पॉडकास्टमधील कथित वक्तव्यामुळे या प्रकरणाला मोठी प्रसिद्धी मिळाली. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना अटक केली आणि न्यायालयाने एक दिवसाची पोलीस कोठडी दिल्याचे वृत्त आहे. भारद्वाज यांनी मात्र ही घटना आत्मरक्षणाच्या संदर्भात असल्याचा दावा केल्याचेही वृत्त आहे. त्यामुळे अंतिम सत्य न्यायालयीन तपास आणि पुराव्यांवरच ठरणार आहे.

दुसरीकडे महाराष्ट्रातील पुणे येथे सोशल मीडिया प्रभावक संतोष पंडित यांना मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याविषयी आक्षेपार्ह असल्याचा आरोप असलेल्या व्हिडिओच्या प्रकरणात अटक करण्यात आली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केल्याचे वृत्त आहे. त्यांना रात्री अटक करण्यात आल्याच्या घटनेवरूनही सार्वजनिक चर्चेला सुरुवात झाली आहे.

या दोन्ही घटनांकडे पाहताना सामान्य नागरिकांच्या मनात एक साधा प्रश्न निर्माण होतो

कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान आहे का?

एखाद्या व्यक्तीवर गंभीर स्वरूपाच्या मारहाणीचा आरोप असेल, तर पोलिसांनी निष्पक्षपणे तपास करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीने मंत्री, सरकार किंवा प्रशासनावर टीका केली म्हणून त्याच्यावर कायद्याचा गैरवापर होऊ नये. टीका चुकीची, अश्लील किंवा कायद्याच्या चौकटीबाहेर असेल तर कायदेशीर प्रक्रिया होणे स्वाभाविक आहे; परंतु ती प्रक्रिया राजकीय दबावापासून मुक्त आणि समान निकषांवर आधारित असणे ही लोकशाहीची मूलभूत अपेक्षा आहे.

लोकशाहीमध्ये पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि सोशल मीडिया वापरणारे नागरिक हे सत्तेचे विरोधक असणे आवश्यक नाही; ते सत्तेला प्रश्न विचारणारे नागरिक असतात.

प्रशासनाच्या निर्णयावर प्रश्न विचारणे, रस्त्यांची अवस्था दाखवणे, भ्रष्टाचार किंवा गैरव्यवस्थेवर आवाज उठवणे, लोकांच्या समस्या मांडणे ही लोकशाहीतील नागरिकांची भूमिका आहे. मात्र त्याच वेळी अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली कोणालाही हिंसा, धमकी, बदनामी किंवा अश्लीलतेचे स्वातंत्र्य मिळत नाही.

म्हणूनच खरी कसोटी एका व्यक्तीची नाही, तर व्यवस्थेची आहे.

जर एखाद्या प्रभावशाली व्यक्तीवर गंभीर आरोप असूनही कारवाई उशिरा होत असेल, तर प्रश्न विचारले जातील. आणि एखाद्या सत्ताधाऱ्यावर टीका करणाऱ्या व्यक्तीवर अत्यंत वेगाने कारवाई होत असेल, तरीही प्रश्न विचारले जातील.

कायद्याचे राज्य म्हणजे कोण सत्तेत आहे यावर कायदा बदलणे नव्हे; तर सत्तेत कोण आहे याची पर्वा न करता कायदा समान पद्धतीने लागू करणे होय.

न्यायालयाने कोणाला दोषी ठरवण्यापूर्वी त्याला गुन्हेगार म्हणणेही योग्य नाही आणि पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या नागरिकाला देशद्रोही किंवा सरकारविरोधी ठरवणेही योग्य नाही.

आज भारतातील सामान्य नागरिकाला सरकारकडून एवढीच अपेक्षा आहे

गुन्हा असेल तर कारवाई करा, पण ती कारवाई सर्वांसाठी समान असू द्या.

आरोपी कोणत्याही विचारसरणीचा असोकायद्याची तराजू समान राहू द्या.

कारण लोकशाहीमध्ये अंतिम प्रश्न हा नसतो की तो कोणाच्या बाजूचा आहे?

अंतिम प्रश्न असतो

कायदा त्याच्यासाठी आणि माझ्यासाठी समान आहे का?

कट्टरता कोणत्याही बाजूची असो, ती समाजाला विभाजित करते. प्रश्न विचारणाऱ्याला शत्रू समजणे आणि कायद्याच्या अंमलबजावणीत दुहेरी निकष निर्माण होणे, या दोन्ही गोष्टी लोकशाहीसाठी धोकादायक आहेत.

न्यायालय स्वतंत्र राहिले, पोलीस निष्पक्ष राहिले आणि नागरिकांना प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य राहिलेतरच संविधानाने दिलेल्या लोकशाहीचा खरा अर्थ जिवंत राहील.

जनतेला भीती नको; जनतेला न्याय हवा.

सत्तेला भक्त नकोत; सत्तेला प्रश्न विचारणारे नागरिक हवेत.

आणि कायद्याला चेहरा नकोफक्त समानता हवी.

**– घनश्याम आंबोकर**
**मीरा भाईंदर**

## न्याय

न्यायहवा हो न्याय
चढत राहतो जिना
खटले ताजे तवाने
जीना पडला जुना

कायदा तो बंदिस्त
मोकाट फिरे गुन्हा
सावली काळीभोर
उजळं रूपडे उन्हा

उलट्या तपासणीत
भळभळे ती वेदना
विसरलेल्याजखमा
फुटे सळाळं पान्हा

जिंकेलं न्याय शेवटी
समजावत रहा मना
प्रतिक्षाही कंटाळली
स्विकारे शुभकामना

वय अमर्याद केसचे
म्हातारा होई तान्हा
उलटतात साक्षीदार
मिळत राहतो बान्हा

सुटो शंभर अपराधी
निर्दोषांला शिक्षा ना
पहिले वाक्य खरे हो
दुज्यांला का अर्थ ना

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# जगात जेष्ठांची संख्या वाढली ... त्यांना आरोग्य व इतर सुविधा पुरविणे आवश्यक

जगात अनेक देशात जेष्ठांची संख्या वाढत चालल्याचे चित्र समोर आले आहे. अमेरिकन जनगणना ब्युरोच्या अहवालानुसार २०२५ मध्ये जगात लहान मुलापेक्षा जेष्ठ वाढले आहेत. आकडेवारीनुसार ५ वर्षाखालील मुलांचा वाटा लोकसंकाखेत १० टक्के पेक्षा कमी आहे. तर जेष्ठ नागरिकांचा वाटा तब्बल १०.५ टक्के एवढा झाला आहे ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. अनेक देशात आरोग्य सुविधा चांगल्या प्रकारे पुरविल्या जातात. या शिवाय जगात जन्मदर सुद्धा घटत चालला आहे. प्रति महिना जन्मदर २.१ किंवा त्या पेक्षाही कमी आहे अशा ठिकाणी सुमारे ७१ टक्के लोकसंख्या राहत आहे. लोकसंख्या स्थिर ठेवण्यासाठी २.१ हा जन्मदर आवश्यक मानला जातो. २०२४ साली जगाची लोकसंख्या ८.१३ अब्ज आहे. ती २०६० पर्यंत १०.२३ अब्ज होण्याचा अंदाज आहे. २०२५ मध्ये ६५ वयावरील जेष्ठांची संख्या जगामध्ये ८५.२ कोटी आहे टी २०६० पर्यंत २ अब्जावर जाईल. जेष्ठांची संख्या सध्या जपान चीन व अमेरिका यामध्ये जास्त होत चालली आहे. अनेक युरोपियन देशात जेष्ठाना अनेक सुविधा व आरोग्य सेवा पुरवल्या जातात. त्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले जाते अनेक जेष्ठ प्रकृती चांगली असल्यामुळे देशासाठी आपले योगदान सेवानिवृत्ती नंतर सुद्धा देत आहेत. आज भारतात सुद्धा जेष्ठाना अनेक सुविधा पुरविल्या जातात.पत्यात आणखी वाढ होण्याची आवश्यकता आहे . अनेक जेष्ठ नागरिक प्रकृती चांगली असल्यामुळे आपले योगदान अनेक क्षेत्रात देऊ इच्छितात त्यांना योग्य ती संधी मिळणे आवश्यक आहे शिक्षण, ट्रेनींग, ॲडमिनिस्ट्रेशन आदी क्षेत्रात अनेक जेष्ठ आपली सेवा बजावीत आहेत एकूणच या पुढील काळात जेष्ठांची संख्या वाढणार असल्यामुळे त्यांना योग्य तो सन्मान, आरोग्य व सेवा मिळावयास हव्यात.

**– शांताराम वाघ, पुणे.**

# लोकशाही दिनातून नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, पनवेल :** नागरिकांच्या तक्रारी व समस्या तातडीने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेत ७ सप्टेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यालयातील बैठक कक्षात झालेल्या या उपक्रमास अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे, शहर अभियंता राजेश कर्डिले, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख कीर्ती महाजन यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

विविध विभागांशी संबंधित दोन अर्ज प्राप्त झाले. संबंधित अर्जांची दखल घेत नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

महापालिकेत दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित केला जातो. नागरिकांनी वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी सादर करावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनी उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.



This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# पत्रकार राजकुमार इकडे यांना महाराष्ट्र गुण गौरव पुरस्कार २०२६ जाहीर



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अहिल्यानगर) :** सामाजिक, पत्रकारिता व जनजागृती क्षेत्रातील गेली १५ वर्षाच्या कालखंडात उल्लेखनिय योगदानाबद्दल पत्रकार राजकुमार इकडे रा.राजणगाव रोड, ता.पारनेर, जि.अहिल्यानगर यांची , बी.द.चेंज फाउंडेशन तर्फे दिल्या जाणार्या महाराष्ट्र गुण गौरव पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली.

पत्रकारितेच्या माध्यमातुन समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणे, जनहिताच्या विषयावर सातत्याने लेखन करणे तसेच सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तनासाठी प्रेरणा निर्माण होत आसल्याची भावना संस्थेने व्यक्त केली आहे.

रविवार, दि.०६ सप्टेबर २०२६ रोजी शिर्डी येथे होणार्या भव्य पुरस्कार सोहळ्यात त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्कारामध्ये ट्रॉफी, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, विशेष भेट वस्तु तसेच परंपारीक पध्दतीने महाराष्ट्रियन फेटा प्रदान करण्यात येणार आहे.

बी.द.चेंज फाउडेशनचे अध्यक्ष अभिषेक तुपे यांनी पाठवलेल्या निमंत्रन पत्राद्वारे राजकुमार इकडे यांना पुरस्कारासाठी निवड झाल्याची माहीती दिली आहे. त्यांच्या निवडी बद्दल पत्रकार, सामाजिक, राजकिय व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडुन त्यांचे अभिंनदन करण्यात येत आहे.

# स्थानिक गुन्हे शाखा व शिक्रापूर पोलीस स्टेशन ची मोठी कारवाई

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०७, शिक्रापूर (पुणे) :** शिक्रापूर, शिरूर पोलीस स्टेशन हद्दीत घरफोड चोरी करणारा सराईत आरोपी दिपक भिमराव दांडगे हा स्थानिक गुन्हे शाखा व शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार यांना मौजे कविटा ता.अचलपूर जि.अमरावती येथे त्याच्या बहिणीकडे रहात असल्याची खात्रीशीर बातमी गोपनीय विभागाकडून मिळताच त्याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीस चौकशी केली असता त्यानी शिक्रापूर, शिरूर परिसरात चोरी केल्याचे कबूल केले.

दिपक भिमराव दांडगे वय २५ वर्षे रा.घुग्री, ता.भैसदेही जि.बैंतुल यावर यावर शिक्रापुर पो स्टे. गु.र.नं. ६६९/२०२६, भा.न्या.सं.क. ३३१ (३), ३०५ (ए), २) शिक्रापुर पो स्टे. गु.र.नं. ६७०/२०२६, भा.न्या. सं.क. ३३१(३), ३०५ (ए), व ३) शिरुर पो स्टे गु.र.नं. ७०८/२०२६ भा.न्या.सं.क. ३३१ (३), ३०५




(ए), प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे कबुल केले असुन पुढील तपास कामी शिक्रापूर पोलीस स्टेशनकडील गु.र.नं. ६६९/२०२६ मध्ये अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपीकडुन चोरीकेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आलेले असुन आरोपी कडुन सुमारे १६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व मोटार सायकल असा एकुण २४ लाख ३० हजार रू. किं. चे हस्तगत करण्यात आले आहे. सदर सराईत आरोपी विरुध्द यापुर्वी महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यांमध्ये एकुण १४ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. आरोपीस मा. न्यायालयात हजर करणेत आले असुन आरोपी सध्या शिक्रापुर पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, सो. पुणे ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक डॉ.शुभम कुमार, पुणे विभाग, उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भासले, शिरूर उपविभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, प्रमोद क्षीरसागर, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस निरीक्षक, चंद्रशेखर यादव, शिक्रापुर पोलीस स्टेशन, सपोनि राहुल देशमुख, शिक्रापुर पोलीस स्टेशन व स्था.गु.शा.चे पोसई महेश डोंगरे, सफौ/संजय पड्याळ,

पोहवा/तुषार पंदारे, पोहवा/जनार्दन शेळके, पोहवा/संजू जाधव, पोहवा/राजु मोमीन, पोहवा/विकास पाटील, पोकों/सागर धुमाळ व शिक्रापुर पो स्टे कडील पोसई उमाकांत कुंजीर, पोलीस अंमलदार सहा फौजदार धनंजय थेऊरकर, पोहवा/अमोल दांडगे, पोहवा/शिवाजी चितारे, पोहवा/रोहिदास पारखे, पोहवा/अमोल नलगे, पोकों/मच्छिद्र निचित, पोकों/नारायण वाळके, पोकों/राम जाधव, पोकों/भारत भोसले पोअंल/अस्मिता जोंधळे यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास शिक्रापुर पोलीस स्टेशन करत आहे.

# कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनतर्फे मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांचे स्वागत



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.७, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता विवेक रोकडे यांची कार्यकारी संचालक (प्रकल्प)पदी पदोन्नती झाल्याने त्यांच्या रिक्त जागी नाशिकचे डॉ. भूषण शिंदे यांची खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंता पदी निवड करण्यात आली.

मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांनी खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा पदभार सांभाळल्यानंतर खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनतर्फे संघटनेचे अध्यक्ष दिलीप बनसोड यांच्या हस्ते डॉ. भूषण शिंदे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला. यावेळी कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे महासचिव दिवाकर घेर, एम. एफ. जैन, शामराव सरोदे,अनिल भोयर, कुणाल भोस्कर, महेश अढाऊ, पुरुषोत्तम चांदेकर, रमेश लोणारे,अहफाझ अहमद, मनोज डेविड, विनोद बरडे, दिलीप ढगे, राहुल गेडाम, चंद्रकांत तुपकर, राजेश खंडारे, रामचंद्र जोगे, देवाजी कुबडे,राजू गभने, हेमराजसिंह परिहार, चंद्रशेखर पानतावणे, नानू भगत, अमरीश गेडाम, राजेश गायकवाड, केशव पानतावणे, तुषार जेस्वानी, दिनेश लोडेकर, सुधीर फेन्डर, कबीर हुसेन, अशोक वासनिक, सुरज भारद्वाज, नागेश निकोसे, इजाज भाई, अमित मेश्राम, आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# कळंबोलीतील पाणी प्रश्नासाठी नगरसेवक शेवाळे यांची धाव; सिडकोला पाईपलाईन बदलण्याचे निर्देश

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०७, कळंबोली (नवी मुंबई) :** कळंबोली सेक्टर-३ परिसरातील रहिवाशांना गेल्या काही दिवसांपासून पाणी पुरवठ्याच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. वारंवार होणारा अपुरा पाणीपुरवठा आणि कमी दाबामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर स्थानिक नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक रामदास शेवाळे यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या.

नागरिकांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत नगरसेवक रामदास शेवाळे यांनी तत्काळ संबंधित परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी पाणीपुरवठा यंत्रणेतील त्रुटींचा आढावा घेतला तसेच सिडकोचे अधिकारी प्रफ



ुल देवरे यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली.

पाहणीनंतर नगरसेवक शेवाळे यांनी संपूर्ण परिसरातील जुन्या व जीर्ण झालेल्या पाईपलाईनची तातडीने पाहणी करून आवश्यक तेथे बदल करण्याच्या सूचना सिडको प्रशासनाला दिल्या. या सूचनांची दखल घेत सिडको प्रशासनाने लवकरच तांत्रिक पाहणी करून काम सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.

कलंबोलीतील नागरिकांच्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांबाबत नगरसेवक रामदास शेवाळे यांनी दाखविलेली तत्परता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. पाणीप्रश्न मार्गी लागण्याच्या दृष्टीने प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

स्थानिकांच्या मते, पाणीपुरवठ्याचा प्रश्न लवकरात लवकर निकाली निघाल्यास कळंबोलीतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, या प्रश्नासाठी नगरसेवक शेवाळे यांनी केलेला पाठपुरावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# वसतिगृहातून पळून गेलेल्या तीन मुलांना पोलिसांच्या मदतीने कुटुंबीयांच्या स्वाधीन



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०७, जिंतूर :** अकोली (ता. जिंतूर) येथील वसतिगृहातून पळून गेलेल्या तीन अल्पवयीन मुलांना नागरिकांच्या सतर्कतेमुळे आणि पोलिसांच्या तत्परतेमुळे सुखरूप शोधून त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. ही घटना रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास मालेगाव-खडकपतीदरम्यान घडली.

अमजद पठाण, इम्रान शाह आणि अक्रम मिर्झा हे जिंतूरहून चारठाण्याकडे परतत असताना रस्त्यात त्यांना तीन अनोळखी मुले भेटली. अक्षय वावळे (वय १०), सूरज मोरे (वय ११) आणि पिराजी वाघ (वय १०) अशी या मुलांची नावे आहेत. त्यांनी चारठाण्याकडे जाण्यासाठी लिफ्ट मागितली. मुलांशी चौकशी केली असता ते अकोली येथील वसतिगृहातून निघून आल्याचे समोर आले. त्यांनी आपण ब्रह्मगावला जात असल्याचे सांगितले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अमजद पठाण यांनी तात्काळ चारठाणा येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी पुंड यांना फोन करून माहिती दिली.

दरम्यान, परभणी पोलिसांची गस्तीवरील गाडी त्याच मार्गावरून जाताना दिसली. पोलिस उपनिरीक्षक खरात व त्यांच्या पथकाची गाडी थांबवून नागरिकांनी पोलिसांना संपूर्ण माहिती दिली. त्यानंतर तिन्ही मुलांना चारठाणा पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

मुलांच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यासाठी गावातील आसाराम जाधव आणि सुनील वाघ यांच्याशी संपर्क करण्यात आला. त्यानंतर पोलिसांच्या आवश्यक कार्यवाहीनंतर तिन्ही मुलांना त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले.या घटनेत नागरिकांनी दाखविलेली सतर्कता आणि पोलिसांनी केलेली तत्पर कारवाई यामुळे तीनही अल्पवयीन मुले सुखरूपपणे आपल्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचली.

# शिळ-डायघर हद्दीत भीषण अपघात : टँकरच्या धडकेत सुरक्षा रक्षकाचा मृत्यू

## चालक कळंबोलीतून जेरबंद !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. ०७, शिळ (ठाणे) :** मुंब्रा-पनवेल महामार्गावर शिळ-डायघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत भरधाव टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणातील पळून गेलेल्या आरोपी टँकर चालकाला पोलिसांनी कळंबोली येथून ताब्यात घेतले आहे.

मृत दुचाकीस्वाराचे नाव मंगेश लक्ष्मण संकपाळ, वय ४५ वर्षे असे आहे. ते १४ गावांमध्ये येत असलेल्या पिंपरी गावातील रहिवासी होते, पोस्ट दहिसर, तालुका जिल्हा ठाणे. ते स्टेट बँक ऑफ इंडिया, जीआयटीसी, बेलापूर सेक्टर अकरा येथे सुरक्षा रक्षक




पदावर कार्यरत होते.

ते सकाळी सहा वाजून वीस मिनिटांनी आपल्या एमएच ०४ जेआर ५६१९ क्रमांकाच्या मोटारसायकलवरून राहत्या घरातून कामावर जाण्यासाठी बेलापूरच्या दिशेने मुंब्रा-पनवेल वाहिनीवरून निघाले होते.

याच दरम्यान पाठीमागून आलेल्या एमएच ०४ जीसी ४५६५ क्रमांकाच्या टँकर चालकाने आपले वाहन अत्यंत सुसाट व बेदरकारपणे चालवत वाहतूक नियमांचे उल्लंघन करून मंगेश संकपाळ यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की ते गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी पडले.

अपघातानंतर आरोपी चालक टँकर घटनास्थळीच सोडून फरार झाला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शिळ-डायघर पोलीस ठाण्याच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व दोन्ही अपघातग्रस्त वाहने पोलीस ठाण्यात हलवली. त्यानंतर तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा माग काढत त्याला कळंबोली येथून शिताफीने ताब्यात घेतले.

या प्रकरणी शिळ-डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ४८४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम २८१, १०६ व मोटार वाहन कायदा कलम १२५ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पोवार हे करत आहेत.

# शेवटचा श्रावणी सोमवार : क्षेत्र महाबळेश्वरमध्ये शिवशक्तीचा जागर

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०७, महाबळेश्वर :** महाबळेश्वर सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या महाबळेश्वर नगरीला लाभलेले निसर्गवैभव जितके अद्वितीय, तितकाच येथील धार्मिक आणि ऐतिहासिक वारसाही समृद्ध आहे. श्रावण महिन्याच्या अखेरच्या सोमवारी श्री क्षेत्र महाबळेश्वरमध्ये शिवशक्तीचा जागर अनुभवायला मिळतो. प्राचीन शिवमंदिरांमध्ये पहाटेपासून सुरू होणारे अभिषेक, पूजन, मंत्रोच्चार आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण क्षेत्र भक्तिरसात न्हाऊन निघते.

स्कंदपुराणातील 'महाबलक्षेत्रमाहात्म्यवर्णन' या उल्लेखामुळे महाबळेश्वर क्षेत्राला प्राचीन धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. धार्मिक परंपरेनुसार महाबळ व अतिबळ या राक्षसांच्या अत्याचारातून सृष्टीची मुक्तता करण्यासाठी त्रिदेवांनी अवतार घेतला. भगवान विष्णूंनी अतिबळाचा वध केला, तर आदिमायेच्या कृपेने महाबळाचा अंत झाला. महाबळाने त्रिदेवांकडून मोक्षाचा वर मागितल्याने या भूमीत महाबळेश्वर, अतिबलेश्वर आणि कोटीश्वर ही पवित्र स्थाने प्रसिद्ध झाल्याची आख्यायिका आहे.

**स्वयंभू महाबळेश्वर शिवलिंग श्रद्धेचे प्रमुख केंद्र**

श्री क्षेत्र महाबळेश्वर मंदिरातील स्वयंभू श्री महाबळेश्वर शिवलिंग हे भाविकांच्या श्रद्धेचे प्रमुख केंद्र मानले जाते. रुद्रस्वरूप मानल्या जाणाऱ्या या शिवलिंगाचे दर्शन व अभिषेक करण्यासाठी श्रावणी सोमवारी भाविक मोठ्या श्रद्धेने मंदिरात दाखल होतात. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचा वास या पवित्र क्षेत्रात असल्याची धार्मिक श्रद्धा



आजही भाविकांच्या मनात कायम आहे.

कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री आणि गायत्री या नद्यांच्या उगमाशी असलेल्या संबंधामुळे महाबळेश्वरचे धार्मिक महत्त्व अधिक अधोरेखित होते. मंदिराला ऐतिहासिक वारसाही लाभला असून, राजमाता जिजाऊसाहेबांची सुवर्णतुला याच मंदिरात झाल्याची ऐतिहासिक परंपरा सांगितली जाते. त्यामुळे हे मंदिर श्रद्धास्थानाबरोबरच इतिहासाची साक्ष देणारे महत्त्वपूर्ण स्थान ठरते.

**पंचगंगा मंदिरात पवित्र उगमस्थानाचे दर्शन**

क्षेत्र महाबळेश्वरमधील पंचगंगा मंदिर हे भाविकांचे आणखी एक प्रमुख श्रद्धास्थान आहे. कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री आणि गायत्री या नद्यांचा उगम येथे होत असल्याची धार्मिक मान्यता आहे. सरस्वती व भागीरथी या नद्या गुप्त स्वरूपात येथे वास करतात, अशीही श्रद्धा आहे. त्यामुळे श्रावणी सोमवारी पंचगंगा मंदिर परिसरात विशेष धार्मिक वातावरण पाहायला मिळते.

**कृष्णाबाई मंदिराची प्राचीन परंपरा**

महाबळेश्वरच्या धार्मिक वैभवात कृष्णाबाई मंदिराला विशेष स्थान आहे. प्राचीन स्थापत्यशैली लाभलेल्या या मंदिरातील शंभू महादेवाची पिंड आणि परिसरातील पुरातन कुंडे या क्षेत्राच्या दीर्घ धार्मिक परंपरेची साक्ष देतात.

**निसर्ग, इतिहास आणि अध्यात्माचा अनोखा संगम...**

श्रावणी सोमवारी महाबळेश्वरमध्ये मंदिरदर्शनासोबतच सह्याद्रीच्या निसर्गरम्य वातावरणाचा आध्यात्मिक अनुभव भाविकांना मिळतो. डोंगररांगांवर पसरलेली हिरवाई, धुक्याची दुलई, मंद पावसाच्या सरी, प्राचीन मंदिरांचे वास्तुवैभव आणि पवित्र जलस्रोत यामुळे संपूर्ण क्षेत्राला आगळे आध्यात्मिक सौंदर्य प्राप्त होते.

श्रद्धा, इतिहास आणि निसर्गाचा त्रिवेणी संगम असलेल्या श्री क्षेत्र महाबळेश्वरमध्ये श्रावणातील शेवटचा सोमवार हा शिवभक्तांसाठी केवळ धार्मिक पर्वणी राहत नाही; तर शिवशक्तीच्या अनुभूतीचा, भक्तीचा आणि आध्यात्मिक ऊर्जेचा मंगल सोहळा ठरतो.

# गुलाबी साडीवर ठेका, चिमुकल्यांची धमाल आणि पैठणीची लयलूट

# 'वेदिका ताईंच्या मंगळागौरीचा साज' सुपरहिट !

## आ. माधवीताई नाईक यांच्या हस्ते उद्घाटन, पहिल्याच वर्षी महिलांचा तुफान प्रतिसाद

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, देसाई तळेपाडा (ठाणे) :** कधी झिम्मा-फुगडीचा ताल, कधी 'गुलाबी साडी' गाण्यावर ठेका आणि मध्ये चिमुकल्यांचा गोड परफॉर्मन्स... देसाई तळेपाड्यातील मातोश्री मंगल कार्यालय रविवार दि. ०६ सप्टेंबर २०२६ रोजी माहेरवाशिणींच्या हास्याने आणि आनंदाने भरून गेले होते.

नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी पहिल्यांदाच आयोजित केलेल्या 'वेदिका ताईंच्या मंगळागौरीचा साज - २०२६' या भव्य उत्सवाला ठाणेकर महिलांनी तुफान प्रतिसाद दिला. दुपारी ३ ते ६.३० पर्यंत चाललेल्या या सोहळ्यात महिलांनी संसाराचा व्याप विसरून फक्त स्वतःसाठी तीन तास जगून घेतले.

**आमदार ताईंची उपस्थिती आणि गुलाबी साडीवर डान्स...**

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार माधवीताई नाईक लाभल्या होत्या. त्यांच्याच शुभहस्ते उद्घाटन झाले. सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, तर सहभागी प्रत्येक महिलेचे स्वागत गुलाबाचे फूल देऊन करण्यात आले.

लकी ड्रॉचा सर्वात खास क्षण ठरला. पहिल्या लकी ड्रॉ विजेत्या सौ. प्रीतम किरण वास्कर, शिळगाव यांची चिठ्ठी आमदार माधवीताई नाईक यांच्याच हस्ते काढण्यात आली. त्यांना गुलाबी रंगाची पैठणी भेट देण्यात आली आणि उपस्थित महिलांच्या आग्रहावरून त्यांनी त्याच ठिकाणी प्रसिद्ध 'गुलाबी साडी' गाण्यावर सुंदर डान्स करून दाखवला. त्यावेळी संपूर्ण हॉल टाळ्यांनी दणाणून गेला.

**चिमुकल्यांनीही जिंकली मने...**

या कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण ठरले ते लहान मुले. मोठ्या आई-ताईंना पाहून लहान मुलांनी स्वतःहून पुढे येऊन सिंगल परफॉर्मन्स दिले. त्यांच्या निरागस डान्सने सर्वांची मने जिंकली. आयोजकांच्या वतीने या चिमुकल्यांनाही खास बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आला.

**लकी ड्रॉ विजेत्या :**

१. सौ. प्रीतम किरण वास्कर - शिळगाव (गुलाबी पैठणी + डान्स)
२. सौ. अर्चना राम म्हात्रे - देसाई गाव
३. सौ. अमिषा पाटील - देसाई गाव
४. जनाबाई पाटील - देसाई गाव
५. पाचव्या लकी ड्रॉमध्ये विजेता झाल्या वैशाली पवार
६. सौ. वैष्णवी सावळे फ, सहाव्या विजेत्या - उखाणा पारितोषिक

**दोन महिने सराव, दहाव्या स्पर्धेत पहिला नंबर!**

प्रथम क्रमांक मिळवलेला ग्रुप - साज ह्यो तुझा (साज ह्यो तुझा), डोंबिवली.

ग्रुप टीचर - साक्षी रंगाकर, सदस्य - १० महिला.

ग्रुपने अक्षराज मीडियाशी बोलताना सांगितले, आम्ही फक्त दोन महिने सराव केला आहे. आतापर्यंत १० स्पर्धांमध्ये भाग घेतला आणि आज या दहाव्या स्पर्धेत आम्हाला पहिले बक्षीस मिळाले. कार्यक्रम आणि नियोजन खूपच छान होते. परीक्षक आणि संचालकांनी आमच्याकडून खूप छान करून घेतले.

**नियोजन आणि बक्षिसे**

प्रत्येक ग्रुपमध्ये १० महिला, १० मिनिटांचे सादरीकरण, पारंपरिक वेशभूषा आणि मोफत प्रवेश.

बक्षिसे - प्रथम ११,१११ रु., द्वितीय ७,७७७ रु., तृतीय ३,३३३ रु. आणि ५ पैठणी साड्या लकी ड्रॉ.

**अंतिम निकाल...**

**प्रथम क्रमांक :** साज ह्यो तुझा ग्रुप - डोंबिवली

**द्वितीय क्रमांक :** शिवशक्ती महिला मंडळ ग्रुप - ओम रेसिडेन्सी, निर्मल नगरी, खार्डीगाव, दिवा पश्चिम





**तृतीय क्रमांक :** जिजाऊ मंगला गौरी ग्रुप

**पंच आणि संचालन :** पंच म्हणून - साक्षी संतोष पाटील, स्वदेश वारणकर यांनी काम पाहिले.

पहिल्याच प्रयत्नात कार्यक्रम हाऊसफुल्ल झाल्याने आयोजक वेदिका पाटील यांनी सर्व महिलांचे आभार मानले.

**या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा विधान परिषद आमदार माधवी ताई नाईक, नगरसेविका वेदिका पाटील, भाजपा जिल्हा अध्यक्ष अभियंता प्रकोष्ठ ठाणे साहिल पाटील, भाजपा दिवा शहर मंडळ महिला मोर्चा अध्यक्षा सपना भगत, भाजपा कौसा मंडल अध्यक्षा नाझिया तांबोळी, सुवर्णा म्हात्रे, उषा पाटील,मुंब्रा मंडळ महिला मोर्चा अध्यक्षा कोमल जितेकर,साधना सिंग,कल्पना सूर्यवंशी, जिया भानुशाली राम म्हात्रे, पत्रकार रमेश राऊत आणि पंचक्रोशीतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# थोडक्यात बातम्या

## कोरा केंद्र नवरात्रौत्सव २०२६ ची भव्य तयारी




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०७, बोरिवली :** मुंबईतील सर्वात मोठा आणि प्रसिद्ध असलेला कोरा केंद्र बोरिवली पश्चिम नवरात्रौत्सव मंडळा तर्फे यंदाच्या नवरात्री आयोजनाबाबत आज, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी पत्रकार परिषद घेण्यात आली.

**पत्रकार परिषदेतील ठळक मुद्दे :**

१. यंदाचे २२ वे वर्ष: कोरा केंद्र नवरात्रौत्सव यंदा २२ व्या वर्षात पदार्पण करत आहे.कार्यक्रमाची माहिती विट्टी इंटरनॅशनल हॉटेल मधील हॉल मध्ये देण्यात आली.

२. तारीख : २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ दरम्यान हा उत्सव साजरा होणार आहे.

३. कलाकारांची मांदियाळी : यंदा गुजरात ची प्रसिद्ध गायक व परफॉर्मनर किंजल दवे यांच्या सुरात तालात गरबा रंगणार आहे. मुंबईतील कोरा केंद्रात गाण्यासाठी गरबा गायिका किंजल दवे ग्रुप नी ४- ५ नवीन गाणे ही तयार केली आहेत. पत्रकारांना आत्मविश्वासाने प्रत्येक प्रश्नाला उत्तरे दिली.

४. विशेष आकर्षण : महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष व्यवस्था, भव्य LED स्क्रीन, आणि पारंपरिक सजावट.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष, गणेश नायडू खासदार गोपाळ शेट्टी व प्रमुख स्पॉन्सर आयोजक ही उपस्थित होते.

कोरा केंद्र नवरात्रौत्सव हा फक्त उत्सव नसून मुंबईची परंपरा आहे. यंदा भक्तांसाठी अधिक चांगल्या सुविधा देणार आहोत, असे आयोजकांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला सर्व वृत्तपत्र आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचे पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 3D गणपती पेंटिंग कार्यशाळेत चिमुकल्यांच्या हातांनी रंगला बाप्पा



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०७, वडगावशेरी (पुणे) :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बालकलाकारांच्या सृजनशीलतेला वाव देत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश पोहोचविण्यासाठी 'सुरेंद्र पठारे फाऊंडेशन'च्या वतीने दिनांक २२ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान वाघोली, खराडी, विमाननगर आणि लोहगाव परिसरात 3D गणपती पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला चिमुकल्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल ३ हजार ६१० बालकलाकारांनी सहभाग नोंदविला.

या कार्यशाळेत सहभागी मुलांना शाडू मातीची गणेशमूर्ती, रंग आणि ब्रश मोफत देण्यात आले. आपल्या कल्पकतेनुसार बाप्पाला रंग देताना चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहण्यासारखा होता. विशेष म्हणजे, चिमुकल्यांनी स्वतःच्या हाताने रंगवलेल्या या 3D गणेशमूर्ती यंदा त्यांच्या घरात बाप्पा म्हणून विराजमान होणार आहेत.

या उपक्रमावेळी नगरसेविका ऐश्वर्या सुरेंद्र पठारे उपस्थित होत्या. त्यांनी चिमुकल्यांशी संवाद साधत त्यांच्या कलाकृतींचे कौतुक केले. मुलांच्या हातांनी साकारलेल्या आकर्षक आणि रंगीबेरंगी बाप्पाच्या मूर्तींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यशाळेत सहभागी झालेल्या चिमुकल्यांसोबत त्यांचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाबद्दल पालकांनीही समाधान व्यक्त केले.

नगरसेवक सुरेंद्र पठारे यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देतानाच चिमुकल्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे सांगितले. बालसृजनशीलता, संस्कार आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम चिमुकल्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला.

## शब्द नव्हे, कृती! बाबाजी पाटील यांच्या पाठपुराव्यातून प्रभाग २९ ला पाचवे आरोग्य केंद्र

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, शिळ फाटा (ठाणे) :** दिवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक २९ मधील खान कंपाउंड, दोस्ती व शिबली नगर परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. केवळ आश्वासन न देता, प्रत्यक्ष कृतीतून विकास साधणारे नगरसेवक बाबाजी पाटील यांच्या अथक पाठपुराव्यामुळे ठाणे महानगरपालिका व महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून प्रभागातील पाचव्या आरोग्य केंद्राचा शुभारंभ आज दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

सुसज्ज लोखंडी केबिन स्वरूपात उभारण्यात आलेले हे आरोग्य केंद्र म्हणजे बाबाजी पाटील यांच्या जनसेवेच्या कार्याची पावती आहे.



प्रभागातील गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांना साध्या आजारासाठीही मैलोनमैल जावे लागत होते. ही अडचण ओळखून आपल्या लोकांना आरोग्यासाठी वणवण करावी लागू नये या एकाच ध्यासाने नगरसेवक बाबाजी पाटील यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आणि हे केंद्र मंजूर करून आणले.

**नागरिकांना होणारे फायदे :**

१. उपचार घराजवळ: खान कंपाउंड, दोस्ती, शिबली नगरमधील नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचणार.

२. मोफत सेवा: रक्तदाब, मधुमेह तपासणी, मोफत औषधे व तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला.

३. माता-बालकांसाठी वरदान: लसीकरण व गरोदर मातांची तपासणी याच केंद्रात होणार.

४. तात्काळ मदत: आपत्कालीन प्रसंगी प्रथमोपचार त्वरित मिळणार.

यावेळी नगरसेवक बाबाजी पाटील यांच्यासह विभाग प्रमुख गणेश मुंडे, विभाग संघटक वैभव आलिमकर, अन्वर कच्ची, आरिफ शेख, आरिफ खान, दोस्ती फाउंडेशनचे चेअरमन आरिफ शेख, आरोग्य केंद्राचे अधिकारी आणि संपूर्ण टीम, शिवसेना पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उल्हासनगरमधील मुद्रांक शुल्क अभय योजना प्रकरणांना ३० दिवसांची मुदतवाढ




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, ठाणे :** महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना-२०२३ अंतर्गत उल्हासनगर शहरातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी राज्य शासनाने विशेष बाब म्हणून ३० दिवसांचा अतिरिक्त कालावधी मंजूर केला आहे. महसूल व वन विभागाने राज्यातील दस्त निष्पादित केलेल्या पक्षकारांना कमी पडलेले मुद्रांक शुल्क व दंडाच्या रकमेत सवलत देणे आणि शासनाचा महसूल जमा करण्याच्या उद्देशाने ही योजना लागू केली होती.

३१ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, अभय योजना-२०२३ अंतर्गत विहित मुदतीत अर्ज दाखल केलेली आणि शासन निर्णयाच्या दिनांकास मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांच्या कार्यालयात प्रलंबित असलेली उल्हासनगर शहरातील प्रकरणे या मुदतवाढीस पात्र असतील. तांत्रिक कारणे, कागदपत्रे वेळेत उपलब्ध न होणे किंवा चलनाची रक्कम शासन जमा करता न आल्याने प्रलंबित राहिलेल्या पात्र प्रकरणांनाही याचा लाभ मिळणार आहे.

या ३० दिवसांच्या कालावधीत पात्र पक्षकारांनी अभय योजनेनुसार देय मुद्रांक शुल्क व दंड शासन जमा करून प्रकरणाच्या निपटाऱ्यासाठी आवश्यक कागदपत्रे व माहिती सादर करावी. मात्र, या मुदतवाढीत नवीन अर्ज दाखल करता येणार नाही. शासन निर्णयाच्या दिनांकानंतर नव्याने दाखल होणाऱ्या प्रकरणांना या सवलतीचा लाभ मिळणार नाही.

मुदतवाढीचा लाभ केवळ उल्हासनगर शहरातील मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांच्या कार्यालयात प्रलंबित पात्र प्रकरणांपुरताच मर्यादित आहे. राज्यातील इतर कार्यालयांतील प्रकरणांना हा लाभ लागू होणार नाही. हा निर्णय विशेष बाब म्हणून घेण्यात आल्याने भविष्यात अशाच प्रकारची मुदतवाढ किंवा सवलत मागण्याचा कोणताही हक्क निर्माण होणार नाही तसेच यामुळे अन्य प्रकरणांसाठी किंवा राज्यातील इतर क्षेत्रांसाठी पूर्वदृष्टांत निर्माण होणार नाही.

उल्हासनगर शहरातील पक्षकारांनी अधिक माहितीसाठी सह दुय्यम निबंधक, उल्हासनगर क्र. १, कॅम्प नं. ५, उल्हासनगर येथे संपर्क साधावा. तसेच सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण), पहिला मजला, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या वर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे (पश्चिम), ४००६०१ येथेही माहिती मिळू शकते.

## धनगर समाजाला एस.टी आरक्षण लागू करा; मुख्यमंत्र्यांना निवेदन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०७ पालम (परभणी) :**

धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाच्या अंमलबजावणीचा प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित आहे. शासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीवर तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी सकल धनगर समाजाच्या वतीने करण्यात आली. याबाबत सोमवार, दिनांक ०७ सप्टेंबर रोजी तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसंदर्भातील प्रकरण सर्वोच्च न्यायालयात अंतिम व निर्णायक टप्प्यात आले आहे. त्यामुळे दि.०८ सप्टेंबर पूर्वी राज्य सरकारने कोणतीही संदिग्ध भूमिका न घेता धनगर समाजाच्या आरक्षणाच्या कायदेशीर हक्कासाठी पूर्ण ताकदीने बाजू मांडणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने धनगर समाजाच्या कायदेशीर हक्कांची भक्कमपणे बाजू मांडून आरक्षणाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात आली.

तसेच न्यायालयाचा निकाल प्रतिकूल लागण्याची शक्यता लक्षात घेऊन सरकारने पर्यायी 'प्लॅन-बी' तयार ठेवावा. न्यायालयाचा निर्णय अनुकूल लागेल, अशी अपेक्षा असली तरी निकाल प्रतिकूल ठरल्यास धनगर समाजाला आरक्षणाची अंमलबजावणी पर्यायी कायदेशीर व प्रशासकीय पद्धतीने कशी करता येईल, यासाठी सरकारने आतापासूनच ठोस नियोजन करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

केंद्र व राज्य शासनाने आवश्यक समन्वय साधून आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या सर्व कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली.

या निवेदनावर गणेशराव घोरपडे, विजय घोरपडे, बाळासाहेब ढोले, ज्ञानराज घोरपडे, माऊली घोरपडे, मंगेश घोरपडे, विजय गाणार, अतुल धुळगुंडे, रावसाहेब शिंदे, नंदकुमार धुळगुंडे, रामेश्वर सुरनर, माधन शिंदे, दत्तराव घोरपडे, दत्तराव शेंगुळे, नवनाथ भोंगळे, साहेबराव सुरनर यांच्यासह समाजबांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.